सहकार खात्यातील (प्रशासन) १४६७
अस्थायी पदांना सन दि.०१/०१/२०१८ ते
२८/०२/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत-

महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. राजस २०१७/प्र.क्र.३३/५ स,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक- १७ जानेवारी, २०१८

वाचा :- १) शासन निर्णय,सहकार,पणन व वस्त्रोदयोग विभाग क्र.राजस१००८/ प्र.क्र.५३८/ ५-स, दि. ५.५.२०११
२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. आस्थापना/ कक्ष-१/अस्थायी पदे/मुदतवाढ/१०१/२०१७, दिनांक ३१/०१/२०१७ व क्र.८१७/२०१७, दि.२८/०७/२०१७ व क्र.१४१८, दि.०४/१२/२०१७
३) वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि २०१६/ प्र.क्र.८/ १६/ आ.पु.क., दि.१०/०२/२०१७,दि.०३/१०/२०१७ व दि.०८.०१.२०१८
४) समक्रमांकाचा शासन निर्णय दि.१८/०२/२०१७ व दि.०९/१०/२०१७.

प्रस्तावना :-

शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग दिनांक ०९/१०/२०१७ अन्वये सहकार खात्यातील (प्रशासन) १४६७ अस्थायी पदे दि.३१/१२/२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली होती. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील स्थायी/अस्थायी पदांच्या आढाव्यानुसार सुधारित आकृतीबंध निश्चित करुन त्या बाबतचा शासन निर्णय दि.०५/०५/२०११ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर आकृतीबंधात वरील १४६७ पदांचा समावेश आहे.

या विभागाच्या क्षेत्रिय आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतिबंधास उच्चस्तर सचिव समितीने दि.२१.१.२०११ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यता दिली आहे. त्यानुसार सुधारीत आकृतिबंधाचा शासन निर्णय दि.५.५.२०११ रोजी निर्गमित करण्यात आला असून सुधारीत आकृतिबंधामध्ये उक्त अस्थायी पदांचा समावेश आहे. वित्त विभागाच्या दि.१/९/२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आकृतीबंधाचा दर तीन वर्षानी आढावा घेणे आवश्यक आहे. त्यानुसार शासन निर्णय दि.५/५/२०११ नुसार निर्गमित केलेल्या आकृतीबंधास दि.५/५/२०१४ रोजी तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव सहकार आयुक्त यांच्याकडून शासनास प्राप्त झाला असुन, तो मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तर समितीच्या मान्यतेस्तव वित्त विभागास सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय दि.०८/०१/२०१८ नुसार, सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु त्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी

पदांना दि.०१/०१/२०१८ ते दि.२८/०२/२०१८ या कालावधीत मुदतवाढ देण्याचे अधिकार देण्यात येत आहेत. दरम्यानच्या काळात सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी दक्षता घ्यावी असे नमूद आहे. सबब सदर १४६७ अस्थायी पदे प्रशासकीय कारणास्तव पुढे चालू ठेवणे आवश्यक असल्याने त्यांना सन २०१७-२०१८ करिता दि.०१/०१/२०१८ ते दि.२८/०२/२०१८ पर्यंत मुदतवाढ मिळणे आवश्यक आहे. त्याबाबतचा प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालयाने संदर्भ क्र. २ च्या दि.०४/१२/२०१७ च्या पत्रान्वये शासनास सादर केला असून सदर बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

सहकार खात्यातील (प्रशासन कक्ष) कार्यरत असणाच्या १४६७ अस्थायी पदांचा शासन निर्णय, दि.५.५.२०११ अन्वये निश्चित केलेल्या सुधारीत आकृतिबंधात त्यांचा समावेश आहे, या अटीच्या अधीन राहून दि.०१/०१/२०१८ ते दि.२८/०२/२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास शासन मान्यता देत आहे. सदर १४६७ पदांची विगतवारी प्रपत्र **"अ"** मध्ये व त्यावरील खर्चाचे लेखाशिर्ष प्रपत्र **"ब"** मध्ये सोबत दर्शविले आहे. त्याप्रमाणे सदरचा खर्च त्या-त्या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षासाठी मंजूर केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

वित्त विभाग, शासन निर्णय, दि.०८/०१/२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०११७१६१६३३४६०२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Manjiri Ganeshbhushan Joshi

Digitally signed by Manjiri Ganeshbhushan Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=91b4708db2a52d675f7f30d81444f3844833dfc7c86d4244ee1075c97c713180, serialNumber=7d5731d128ab41d6a090557a2e9658b7382ac03af6e239ba66cc1cf9a6cf2f52, cn=Manjiri Ganeshbhushan Joshi
Date: 2018.01.17 16:22:56 +05'30'

(मं.ग.जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
६. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

७. महालेखापाल, महाराष्ट्र-१,२, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई, नागपूर
८. जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
११. उपकोषागार अधिकारी, वाशी, नवी मुंबई
१२. वित्त विभाग, व्यय-२ / अर्थसंकल्प-१९/ वित्तीय सुधारणा -१
१३. कार्यासन अधिकारी, १७-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. निवड नस्ती, कार्यासन ५- स.

प्रपत्र- "अ"

शासन निर्णय क्र. राजस २०१७/ प्र.क्र. ३३/ ५ स, १७ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयातील सहकार खात्यातील (प्रशासन) कार्यरत असणाऱ्या १४६७ अस्थायी पदांच्या विगतवारीचे विवरणपत्र

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रुपये)	ग्रेड पे	पदांची संख्या
	अ) राजपत्रित			
१	अपर आयुक्त व विशेष निबंधक	३७४००-६७०००	८८००	१
२	अपर निबंधक	३७४००-६७०००	८७००	३
३	सहनिबंधक	१५६००-३९१००	६६००	३
४	उपनिबंधक	१५६००-३९१००	५४००	४९
५	सहायक निबंधक	९३००-३४८००	४४००	१६१
	ब) अराजपत्रित			
६	वरिष्ठ श्रेणी लघुलेखक	९३००-३४८००	४४००	१
७	कार्यालय अधिक्षक	९३००-३४८००	४३००	२३
८	सहकार अधिकारी श्रेणी-१	९३००-३४८००	४३००	१३६
९	कनिष्ठ श्रेणी लघुलेखक	९३००-३४८००	४३००	१४
१०	लेखापाल वरिष्ठ श्रेणी	९३००-३४८००	४२००	३१
११	मुख्य लिपीक	९३००-३४८००	४२००	१७२
१२	सहकार अधिकारी श्रेणी-२	९३००-३४८००	४२००	१६४
१३	शिरस्तेदार	९३००-३४८००	४२००	१
१४	विभागीय मूल्य निरीक्षक	९३००-३४८००	४२००	१
१५	प्रतवारी पर्यवेक्षक	९३००-३४८००	४२००	७
१६	वरिष्ठ लिपीक	५२००-२०२००	२४००	५४
१७	सहायक सहकार अधिकारी	५२००-२०२००	२४००	१४५
१८	सांख्यिकी सहाय्यक/ निरीक्षक	५२००-२०२००	२४००	२२
१९	लघुटंकलेखक	५२००-२०२००	२४००	२
२०	वरीष्ठ हातमाग पर्यवेक्षक	५२००-२०२००	२४००	१
२१	कनिष्ठ लिपीक	५२००-२०२००	१९००	१३९
२२	प्रतवारीकार	५२००-२०२००	१९००	२४
२३	प्रयोगशाळा सहाय्यक	५२००-२०२००	१९००	४
२४	कनिष्ठ हातमाग पर्यवेक्षक	५२००-२०२००	१९००	१
२५	वाहन चालक	५२००-२०२००	१९००	१७
	वर्ग-४			
२६	नाईक	४४००-७४४०	१६००	४
२७	शिपाई	४४००-७४४०	१३००	२७३
२८	प्रतवारी परीचर	४४००-७४४०	१३००	१३
२९	पहारेकरी			१
	एकूण			**१४६७**

प्रपत्र - "ब"

योजनानिहाय आस्थापनानिहाय खर्चाचे लेखाशिर्ष

अ.क्र.	योजना निहाय आस्थापना	लेखाशिर्ष
१	सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे	२४२५-सहकार, ००१-संचालन व प्रशासन, (०१) संचालन व प्रशासन, (०१)(०१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, दत्तमत-(२४२५००११) भारित (२४२५००२२)
२	संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे	२४२५-सहकार, ००१-संचालन व प्रशासन,(०१) संचालन व प्रशासन,(०१)(०३) पणन संचालक दत्तमत (२४२५ ००४९) भारित (२४२५०९९८)
३	संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर	२४२५-सहकार, ००१-संचालन व प्रशासन, (०१) संचालन व प्रशासन (०१)(०४) हातमाग, यंत्रमाग व सहकारी वस्त्रनिर्माण यांचे संचालनालय (२४२५००५८)
४	विभागीय व जिल्हा पातळी	२४२५-सहकार, ००१-संचालन व प्रशासन, (०१) संचालन व प्रशासन, (०१)(०५) विभागीय व जिल्हा प्रशासन दत्तमत (२४२५ ००६७) व भारित (२४२५ ११६१)
५	वसूली योजनेखालील १२० शिपायांची पदे	२४२५-सहकार, ००१-संचालन व प्रशासन, (०१) संचालन व प्रशासन, (०१)(०७) वसुलीच्या कामाकरिता कर्मचारी वर्ग (२४२५ ००८५)
६	बाजार वार्ता, समन्वय सेवा व पणन (संशोधन व सर्वेक्षण)	२४२५-सहकार, १०८, इतर सहकारी संस्थांना सहाय्य, (०१) पणन सहकारी संस्था (०१)(०१) एकात्मिकृत बाजार वृप्त सेवा (२४२५०३८१) (०१)(०२) पणन, सर्वेक्षण व संशोधन याकरिता कर्मचारी वर्ग (२४२५०३९९)
७	प्रतवारी विकास	२४२५-सहकार, १०८ इतर सहकारी संस्थांना सहाय्य (०१) पणन सहकारी संस्था, (०१)(०३) प्रतवारी विकास (२४२५०४०५)
८	सहकार ग्राहक भांडाराची संघटना	३४५६-नागरी पुरवठा, १९५ ग्रामीण भागातील ग्राहक संस्थांना सहाय्य, (०१) पर्यवेक्षी कर्मचारी वर्ग, (०१)(०१) पर्यवेक्षी कर्मचारी वर्ग (३४५६००१२)
९	सहकारी उपसा जलसिंचन कक्ष	२४२५-सहकार, १०८ इतर सहकारी संस्थांना सहाय्य (०५) इतर संकीर्ण सहकारी संस्था (०५)(०१) सहकारी उपसा सिंचन योजनांकरिता कर्मचारी वर्ग (२४२५०६१२)
१०	योजनेत्तर, आदिवासी योजनेखाली मंजूर झालेला कर्मचारी वर्ग	२४२५-सहकार, ००१-संचालन व प्रशासन, (०१) संचालन व प्रशासन,(०१)(०१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, दत्तमत (२४२५ ००११) भारित (२४२५००२२)